*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ॥*

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक**

**संपादक**
**रामचंद्र मुटाटकर**

# हाकारा (त्रैमासिक)

**कार्यकारी संपादक**
**ग. शां. पंडित**

**वर्ष : ३४ वे** **जानेवारी – जून २०१३** **अंक : पहिला–दुसरा**

## अनुक्रमणिका

### धारणी (मेळघाट) क्षेत्रातील आदिवासी उत्थान कार्यक्रम


| | | |
|---|---|---|
| | संपादकीय | २ |
| १) | दृष्टिक्षेपात अहवाल कार्यक्षेत्र – धारणी (मेळघाट) | ३ |
| २) | सकस खाऊ | ९ |
| ३) | गरोदर माता जेवण कार्यक्रम | १७ |
| ४) | झबले–टोपडे–दुपटे | २३ |
| ५) | वजन नोंद | २५ |
| ६) | औषध वाटप कार्यक्रम | २७ |
| ७) | आश्रमशाळा | ३१ |
| ८) | आदर्श अंगणवाडी | ३८ |
| ९) | वैदू प्रशिक्षण | ४० |
| १०) | प्रशिक्षण कार्यकम्र | ४३ |
| ११) | वाचनालय व माहिती मार्गदर्शक केंद्र | ४५ |
| १२) | आरती संस्थेचे ग्रामोपयोगी व शेतीविषयक प्रशिक्षण | ४६ |
| १३) | पपेट शो प्रशिक्षण : जन–जागृती कार्यक्रम | ५० |
| १४) | पंचायत राज प्रशिक्षण | ५७ |
| १५) | किशोरवयीन मुली : आरोग्य शिक्षण | ५९ |
| १६) | धारणी कार्यक्षेत्रातील स्वयंसेवक | ६४ |
| १७) | पायाभूत सर्वेक्षण – परिस्थिती | ६५ |
| १८) | नाशिक मेळाव्याचा वृत्तांत | ६९ |


◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
२०१, आकांक्षा रेसिडेन्सी,
औंध, पुणे – ४११ ००७.
टेलिफोन (०२०)२५८९७२९८

**अंक मूल्य ८०/– रूपये**

◆ **अक्षर जुळणी**
नंदू हि. दिघे
सौ. स्वाती दंडारे

◆ **मुद्रण स्थळ**
असाईन सिस्टिम्, पुणे

◆ **धारणी अहवाल लेखन**
डॉ. शैलेश दळवी
श्री. ओमप्रकाश वाघमारे
श्री. संतोष व्यवहारे
श्री. ग. शां. पंडित


◆ **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर, अध्यक्ष
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **प्रकल्पातील सहभागी व्यक्ती**
श्री. नरेश पानझाडे
श्री. ओमप्रकाश वाघमारे
श्री. संतोष व्यवहारे
श्री. सुरेंद्र तांदळे
श्री. विजय घुग्गुसकर

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

या अंकाच्या प्रकाशनासाठी **भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांचेकडून अनुदान मिळाले आहे.



# संपादकीय .......

महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभागाने २००४ साली संयुक्तपणे ग्रामीण आरोग्य प्रकल्प, जामखेड व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे या दोन स्वयंसेवी संस्थांना कुपोषण रोखण्यासाठी आरोग्यविषयक 'आदिवासी उत्थान कार्यक्रम' प्रदान केला. २००५ साली प्रत्यक्ष कामास सुरुवात झालेला कार्यक्रम मार्च २०१३ साली संपणार आहे. महाराष्ट्रातील ७ जिल्हयांतील, ९ आदिवासीबहुल तालुक्यांत ग्रामपंचायत घटक मानून सर्व आदिवासी समाजात कार्यक्रम राबविण्यात आला आहे. ४७२ आदिवासी पुरुष व स्त्री स्वयंसेवक, ६० आदिवासी मार्गदर्शक व २२ आदिवासी सहाय्यकांनी नऊ समन्वयकांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाची अंमलबजावणी केली. प्रशासकीय खर्च एकंदर बजेटच्या १०% च्या आसपास करण्यात आला. कुपोषण कमी करताना, आदिवासी मनुष्यबळाच्या मानव विकासाचे ध्येय साधण्यात आले आहे.

**मेळघाट - धारणी**

महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रातील मुलांचे कुपोषण मेळघाटसंबंधी जनहितयाचिका व प्रसारमाध्यमांमुळे प्रकाशाच्या झोतात गेली २० वर्षेआहे. आदिवासी उत्थान कार्यक्रमांतर्गत मेळघाटमधील धारणी कार्यक्षेत्रात१९ गावांमध्ये ४४ महिला, पुरुष आदिवासी स्वयंसेवकांमार्फत कुपोषण रोखण्याचे, शासकीय यंत्रणेमार्फत अंमलबजावणी होण्यायोग्य, प्रतिमान विकसित झाले आहे.

यामध्ये प्रामुख्याने गरोदर मातेस एकवेळ संपूर्ण जेवण मिळाल्याने बाळाच्या जन्मवजनाचे प्रमाणात लक्षणीय वाढ दिसून येते. तसेच पौष्टीक पूरक आहार मिळाल्याने वय ६ महिने ते ३ वर्षे बालकांच्या वजनात वाढ होते असे दिसते. स्तनदा मातेस आयुर्वेदिक पौष्टिक द्रव्यमिश्रीत पूरक आहार मिळाल्यास ६ महिनेपर्यंत बालकांचे वजन वाढते, रोग प्रतिकारक शक्तीही वाढते असे प्रत्ययास आले.

यासाठी केवळ आहार महत्त्वाचा नसून हगवण, श्वसनासंबंधी संसर्गजन्य रोगांचा प्रादुर्भाव रोखण्याचे कार्यक्रम महत्त्वाचे आहेत. चोवीस तास हाताशी ॲलोपॅथी व आयुर्वेदिक औषधांचा मोफत पुरवठा प्रत्येक गावात ठेवण्याचे चांगले परिणाम दिसून येतात.

मेळघाटमधील धारणी कार्यक्षेत्राच्या आदिवासी उत्थान कार्यक्रमाबाबत दृष्टिक्षेपातील अहवाल व संपूर्ण अहवाल सादर करीत आहोत. त्यावरुन घरी पोषणयुक्त आहाराची शाश्वती, संसर्गजन्य रोगप्रतिबंधक उपाय महत्त्वाचे वाटतात. अंगणवाडी स्वरुपात थोडे बदल झाल्यास, म्हणजे ६ महिने ते २ वर्षे बालकांचे आरोग्य, तसेच गरोदर, स्तनदा व किशोरवयीन मुलींचे आरोग्य हा एक भाग; ३ ते ६ वर्षे मुलांचे आरोग्य व शिक्षण यावर भर देणारी भूमिका हा अंगणवाडीच्या कार्यपध्दतीचा दुसरा भाग केल्यास, कुपोषण प्रतिबंध व बालशिक्षण यामध्ये लक्षणीय प्रगती दिसून येईल.

**प्रा. रा. के. मुटाटकर**

# दृष्टिक्षेपात अहवाल

## कार्यक्षेत्र – धारणी (मेळघाट)

**आदिवासी उत्थान कार्यक्रम** या नावाने आदिवासी लोकांचे आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्याचा कार्यक्रम २००५ जानेवारीमध्ये सुरू झाला. आदिवासी लोकांचा सर्वांगीण व शाश्वत मानव विकास करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातील सात आदिवासी जिल्हयातील नऊ आदिवासीबहुल तालुक्यात कृती कार्यक्रम सुरू केले. मेळघाट क्षेत्रातील धारणी तालुक्यातील १९ गावांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात आला.


**मानव विकास निर्देशांकानुसार फलनिष्पत्ती**

**घटक : आरोग्य**

**(१) माता बाल पोषण (गरोदरमातांना जेवण)**

सप्टेंबर २००८ ते मार्च २००९ मध्ये गरोदर मातांना एक वेळ पूर्ण पोटभर जेवण दिले गेले. त्यामुळे २.५०० किलोग्रॅम पेक्षा अधिक जन्म वजनांची संख्या वाढली.

| कालावधी | जन्म वजन | २.५ कि. ग्रॅम पेक्षा कमी | २.५ कि. पेक्षा जास्त |
|---|---|---|---|
| जानेवारी ते डिसें. २००७ | संख्या | १९५ | २४५ |
| | टक्केवारी | ४४.३२% | ५५.६८% |
| सप्टें ०८ ते मार्च ०९ | संख्या | ९४ | २३४ |
| | टक्केवारी | २८.६६% | ७१.३४% |




**लक्षणीय फलनिष्पत्ती :** गरोदर मातांना एकवेळ स्वयंसेवकाच्या घरी वरण, भात, भाकरी, पोळी, भाजी असे पोटभर जेवण मिळाल्याने मुलांच्या कमी वजनाच्या टक्केवारीत ४४% वरुन २९% पर्यंत घसरण झाली.

**(२) मुलांकरिता पूरक आहार**

६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील मुलामुलींना गहू व चणाडाळ भाजून, दळून तयार केलेला पाणी मिसळून, न शिजवता खाण्यास योग्य पूरक आहार 'सकस खाऊ ' या नावाने देण्यात आला. धारणी कार्यक्षेत्रात दरमहा साधारणपणे १२०० मुलांना हा पूरक आहार देण्यात आला. या आहाराने मुलांच्या पोषण श्रेणीत (वय व वजनाच्या आधारे काढलेल्या श्रेणीत) सुधारणा झाल्याचे दिसते.

स्थानिक पातळीवर मुलांचे वजन घेणे व श्रेणी तक्त्याच्या आधारे श्रेणी काढणे याचे प्रशिक्षण स्वयंसेवकांना देण्यात आले होते. श्रेणी स्वयंसेवकांनी